

# परणीधराचे आलाप

—राजा बढे.

मूल्य सहा आणे

# प्रथम प्रयोग

मराठी नाट्य-वार्षिकोत्सव १९४६

रविवार दि. ३ फेब्रुवारी

रात्री ८ वाजतां

# धरणीधर

लेखक : श्री. भा. वि. वरेरकर

दिग्दर्शक : श्री. चिंतामणराव कोल्हटकर

संगीत दिग्दर्शक : श्री. गोविंदराव अग्नि

पद्यरचना : श्री. राजा बढे

: भूमिका :

| | | |
|---|---|---|
| धरणीधर | ... | श्री. जयराम शिलेदार |
| युवराज | ... | ,, आप्पा पेंडसे |
| राजा | ... | ,, टेंबे |
| वरजोरजी | ... | ,, नानू संझगिरी |
| भुजंगराव | ... | ,, वगळ |
| पांडूतात्या | ... | ,, लिमये |
| कुबावा | ... | ,, कोल्हटकर |
| ★ ★ | ★ | ★ ★ ★ |
| करुणा | ... | कु. प्रमिला जाधव |
| जेरबानू | ... | ,, सीता मुल्की |
| मुलमा | ... | ,, देवी जाधव |
| सगुणा | ... | ,, शालिनी म्हारदोळकर |

# धरणीधर

–१–

धरणीधर :

दीनाञ्जना दुखवा न ञाया !
करुणाकरा नित लोकनाथा
भूमीजना यमयातना,
कां राजया ?
पतितानता अजि होइ त्राता

–२–

करुणा :

न कळे हा कोण कुठुनि बंडखोर आला
मानभंग करित धीट
नजर झुंजवीत नीट
भंगुनिया वेस घालि हात काळजाला

जिंकियलें मन नयना
देइ धीर बंदिजना
हसत वदनिं राजसदनिं घालि मदन घाला
साद हीच रातदिनीं
नृपनंदिनि नच बंदिनि
चल कुंवरी सोडुनिया राजबंदिशाला

–३–

धरणीधर :

मायभूमी दुरिता वाराया
बल दे जीवा या
प्रभुराया, अभय छाया
करि कृपाला, नृपलीला हाय हाय करित घाय

–४–

सगुणा :

( लावणी )

काय धरिसी माझा गळा, अरे अवखळा
पुरे बळजोरी
साधी न तुला ही चांदण्यांतली चोरी ध्रु०

खाशील दशमिचा चांद काय रे खुळ्या
चांदणं पिठोरी रानहरळिच्या मुळ्या
चटणीस चवीला जाइजुईच्या कळ्या
कुशा बावळ्या प्रीत चचला
प्यायास चकोरा चंद्रकलेच्या चुळा !
या उपास पोटीं पीर्त नव्हे रे बरी
संभाळ चाकरी मिळवाया भाकरी
पोटास लागतिल् कळा, उन्हाळी झळा
कसा खडीसाखरेवरी
चावरा चटावला मुंगळा

–५–

**जेरबानू :**

रसरंगा ये भृंगा
माझ्या सारंगा
प्रीतविहंगा घालिसि पिंगा
वे सुमसंगा
चंचल मन हें झालें श्रीरंगा
जाइजुई या कलिका
मधुमालती माधविका
आल्या बहराला ब्रिजलाला
शोधित यमुना प्रीतीची गंगा

-६-

जेरवान् :

वसंत येई घरा, जिवलगा
मादक यौवनभरा
भुलविते मना हीं उदासवाणी
चंद्रकला चतुरा
जरि अपुले पेले भरले
किति रिते सभोती उरले
बेभान करी पीता अधरीं
प्रीतीची मदिरा
जगा विसरवी, स्वर्गसुखाचा
मायमाउली वसुंधरा

-७-

धरणीधर :

प्रणय मधुरा माया रचिता
अराजका पाशीं फसविता
मुक्तिमंगला मोही जिवाला
झुंजवी आझाद हिंद वीर नेता

—८—

करुणा :

सखया तुज वाहियलें ह्रदया
परि हाय पहा सुख जाय लया
मज जन्म दिला कां थोर कुळीं
चुरली कलिका प्रभु पायदळीं
गगनीं विहगा मज नेइ सवें
आशेचे तुटले पंख नवें
विरहें भरलें जल या नयनीं
प्रभु ही करुणा भिजवी धरणी
नच योग जुळे कळलें न तया
अवमान करी रमणी प्रणया
मज नेइं प्रभो नव प्रीतिपथें
चुकलें मुकलें मनिं मी झुरतें

—९—

सगुणा :

( लावणी )

तें राजहंस पाखरूं कसें ग हातांतुनि सुटलें
नजरेंत ओविले सये घळघळा अश्रुमणी तुटले

ती झडप प्रीत पंखाची
सुख जखम चोंच डंखाची
करि राणी तिज रंकाची

चंद्रावरती कलंक आणी खूण काय अंकाची
फुलवायाची शोभा कमले किमया ही पंकाची
दैवें हाय नयन मिटले

–१०–

**धरणी :**

अंगार हा हृदया दाही
पाही आशा नाशा या
गांव नगर घरदार नृपासन
क्षोभ हा लोक मुक्ति याग

–११–

**करुणा :**

अजि मी राजकुला विटलें
घरकुलांत नंदन नटलें
मानवतेच्या कारागारीं जीवा सुख कुठलें

नदीतिरीं जायचें घेउनी कटीवरी घागरी
मुग्धसुखाच्या तरंगावरी परतायाचें घरीं
पाठीवर आघात चालता खांद्यावरती पिळे
भोगायातें संसाराचें वैभव हें आगळें
खाउनि कोंडा कणी, सुखानें
ल्याया फुटका मणी
मी रंकाची राणी नसत्वा संसारीं रतलें

–१२–

**करुणा :**

लाभला जिव्हाळा
जिवलग जीवाचा येता
अबला बलशाली आज राजकाजा

–१३–

**सगुणा :**

**( लावणी )**

रे शुका, मला ठाउका, कशाला फुका, लाविशी गमजा
येशील माशुकापाठि, कामुका ओठि, लाल घोटीत
मनामधिं समजा
भले भले काम कावळे, जगीं पाहिले, संत वरपांगीं
पळसाला पानें तीन होति मतिहीन प्रीति रतिरंगीं

कुणि पुसला कांहो कलंक या चंद्राचा
कीं पापहेतु हा लपला देवेंद्राचा
कां आव आणिशी फुकाच कुलवंताचा
शेजारीं घरीं बाजारिं राज दरबारिं पुजारी सारे
हेरती नार बेजार जिव्हारी वार झेलुनी ठार होति परभारें
हें गुपित जरा तरि उमजा—

—१४—

करिं स्वाधीन वरदे भारता
होय बघुनि कधि ही परवशता
मन जागे
करिं स्वतंत्र ही जनता रे
सहकारी सारे
तारीं अबलां गे

मुद्रक : **वि. पु. भागवत,** मौज प्रिंटिंग ब्यूरो, मुंबई नं. ४
प्रकाशक : **वि. र. वाम,** रामकृष्ण बुकडेपो, मुंबई नं. ४

- धार्मिक ग्रंथ
- नाटकें, कादंबऱ्या
- क्रमिक पुस्तकें
- राजकीय ग्रंथ
- नमुनेदार प्रकाशन

यांसाठीं

रामकृष्ण बुक डेपो

गिरगांव : मुंबई ४

★

★

★

फाल्गुनाचें शरसंधान

आ दे श

साप्ताहिक

अनेक दृष्टींनीं वाचनीय वाटतें.

टिळक पुतळा, नागपूर.

# साकार दर्शन

मना सज्जना गूज हें ठेव ध्यानीं
छवी आपुली ही पहा लोचनांनीं
तिचे कारणीं ये कलामंदिरीं या
साकार छाया करी यंत्र माया.

रम्याकृती जो नर बिंबवीतो
जगीं तोचि तो मानवी धन्य होतो.

**किरण कला मंदिर**
गिरगांव नाका
फोन. नं. ३३१२१

—पाठक बंधु

# नवीन रेकॉर्डस्

## हिराबाई बडोदेकर

VE 5056 } विनवित शबरी रघुराया रे....राजा बढेकृत
नन्दलाला नाच रे....ग. के. दातारकृत

## मास्टर राम मराठे

GE 3586 } देवा धरिले चरण
झुरलें मानस उदास { नाटक संत कान्होपात्रा

## गोविंद कुरवाळीकर

GE 3547 } आली रे आली ओंबेवाली
चाललीस कुठं ग चंद्रावळी { ग. दि. माडगूळकरकृत

## पंडितराव नगरकर

GE 3572 } मन खुललें मोहरलें
किती सांगू प्राणसख्या { ग. के. दातारकृत

धरणीधर नाटकांतील गाणीं लवकरच
कोलंबिया रेकॉर्डवर ऐकण्यास मिळतील.

रेकॉर्ड सर्व कोलंबिया व्यापाऱ्यांकडे मिळतील.

**कोलंबिया ग्रामोफोन कं. लि.**

डमडम, मुंबई, मद्रास, दिल्ली, लाहोर,

रंगभूमीचा यंत्रयुगांतील विकास
म्हणजेच रजतपटाचा सुरम्य विलास
मराठी नाट्याची परंपरा उज्वलतर
करणारी—

**माझं बाळ, चिमुकला संसार, गजाभाऊ, बडी माँ**

या नामवंत चित्रांचे जनक

# प्रफुल्ल पिक्चर्स

: निर्माते–दिग्दर्शक :

## वि ना य क

यांची

# सु भ द्रा

सादर करीत आहे

कथा : **वि. स. खांडेकर** • संगीत : **वसंत देसाई**

भूमिका : **शांता आपटे** (एस.ए. कन्सर्नच्या सौजन्यानें)
ईश्वरलाल, याकूब, मीनाक्षी, शांतारीन, उषा मंत्री,
लता, साळवी, दामुअण्णा मालवणकर, जोग, निंबाळकर
आणि **प्रेम अदीब**

**प्र फु ल्ल पि क्च र्स,** मुंबई ४

# एक अपूर्व करमणूक

रहस्यमय रोमांचकारी बोलपट—

पंचोली कलाचित्र—

# ध
# म
# की

भूमिका : ★ रागिणी ★ अलनासीर

★ स्मृति ★ कलावती व ★ अजमल

**मिनर्व्हा** २ ऱ्या महिन्यांत

रोज-४, ७ व १० तुफान गर्दीत चालू

रवि. सुट्टीला दु. १ वा. आगाऊ तिकिटें बॉक्स

: फेमस प्रकाशन : बाल्कनी, रोज १० ते १२

जनमनरंजन—
नवरसपूरित—
शुचिरुचिसूचित—
ललितकलाकृति—



# शान्तिचित्र

भवरम्य हृदयगम्य – भव्य दिव्य दीनमित्र
सुखवि दुखवि हसवि जना हें पहिलें (शांतिचित्र)